**सुशिक्षीत बेरोजगार अभिंयता नोंदणी साठी आवश्यक असणारी कागदपत्रे (सुधारीत)**

नोंदणी कालावधी ५ वर्षा करीता

१. जोडपत्र 'क' विहीत नमुन्यात अर्ज

२. १ वर्षाचा कोर्स झालेल्या उमेदवाराकरीता रु.१.०० लक्षाचे शेडयुल बँक किंवा राष्ट्रीयकृत बँकेकडील ऐपत प्रमाणपत्र

३. नोंदणी शुल्क वर्ग ५-अ करीता रु.७५००/- व वर्ग- ७ करीता रु.३०००/-

४. पदवी/पदविका/ए.एम.आय.ई परिक्षा प्रमाणपत्राच्या सांक्षांकित प्रती

५. रहिवाशी प्रमाणपत्र

६. पासपोर्ट साइजचे तीन फोटो

७. नोंदणीचे वेळी ते बेरोजगार असल्याबाबत तसेच कोठेही नोकरीत नाहीत,अशा आशयाचे रु.१००/- च्या स्टँपपेपरवर नोटरीने प्रमाणित केलेले प्रतिज्ञापत्र

८.सेवायोजन कार्यालयात नोंदणी केल्याबाबतचे शैक्षणिक पात्रता दर्शविणारे प्रमाणपत्र

९. जन्म तारीख व जन्मस्थळाचा पूरावा म्हणून १० वी किंवा १२ वी ची टी.सी

१०.उमेदवाराचे ज्या बँकेत खाते आहे. त्या बॅकेच्या पासबुकचे दुसरे पान आणि शेवटच्या बँक व्यवहाराची झेरॉक्स प्रत

कार्यकारी अभियंता(बांधकाम)
जिल्हा परिषद,उस्मानाबाद

शा.अ./ उप.का.अ.(बां)

# सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या नोंदणी संदर्भात अटी व शर्ती

१. नोंदणीच्या **नुतनीकरणा** करिता वैधतेचा अंत होण्यापुर्वी तीन महिने अगोदर संबंधित कार्यकारी अभियंता कडे नवीन पतदारी प्रमाणपत्रासह जे अर्जाच्या तारखेपुर्वी एक महिण्यापेक्षा पुर्वीचे दिलेले नसावे आणि इतर विहित दस्तऐवज कंत्राटदारानी त्यांचा विहित नमुन्यातील अर्ज सादर केला पाहिजे आणि विहित नोंदणी शुल्क अदा केले पाहिजे.

२. कंत्राटदाराचे कृत्य (Performance) प्रमाणपत्र **नुतणीकरण** नोंदणी मंजुरी देण्यापुर्वी विचारात घेतले जाईल.

३. जर कोणताही कंत्राटदार विहित कालवधीत त्यांच्या नोंदणीच्या **नुतनीकरणाकरीता** अर्ज करण्यास चुकला तर त्याची नोंदणी रद्य समजली जाईल, त्यास नव्याने नोंदणीकरीता अर्ज करावा लागेल.

४. नोंदणी/नुतणीकरणाच्या तारखेपासुन पाच वर्षाच्या कालवधीत ज्या कंत्राटदारानी कोणत्याही कामाच्या निविदा भरल्या नाहीत आणि जो निविदा भरेल परंतु जि.प.चे कंत्राट सुरक्षित ठेवण्यास चुकेल अशा कंत्राटदाराचे नाव मान्यता प्राप्त कंत्राटदाराच्या नोंदणी पासून कमी केले जाईल.

५. नोंदणी /प्राधिकाऱ्याकडून सुलभीकरण छाननी करीता कंत्राटदारानी प्रत्येक वर्षाच्या ३० एप्रिल पुर्वी संबंधीत नोंदणी प्राधिकाऱ्याकडे नोंदणी/ नुतणीकरण देण्यामध्ये तसेच प्रत्येक वर्षाच्या मार्च अखेर ड- जोडपत्रामध्ये विहित नमुन्यात विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे ज्या कार्यकारी अभियंताच्या विभागाकडून कंत्राटदारानी निविदा भरल्या बांधकामे केली त्यांच्याकडून त्यांच्या कृत्य संबंधी शेऱ्यासह सादर केले पाहिजे.

६. जर ज्या कंत्राटदाराचे नाव कमी केलेले असेल. मागाहुन तो कंत्राट घेवू इच्छित असेल तर त्यानी **पुनर्नोंदणी** करीता सर्व विहित दस्तऐवज, विहित शुल्क अदायीसह अर्ज केला पाहिजे अशा प्रकरचा अर्ज त्याच्या गुणवतेवर विचारात घेतला पाहिजे.

७. निविदा करारप्रमाणे व खात्याच्या निर्देशाप्रमाणे काम पुर्ण न करणाऱ्या सु.बे.अ. यांना काळ्या यादीत घालण्याचा अधिकार काम वाटप समितीस असेल.

८. नोंदणीकृत सु.बे.अ. यांनी वर्ग पात्रते पर्यंतचे कामांच्या उपलब्धते नुसार रु ५.०० लक्ष पर्यंतचे एक काम किंवा तेवढयाच किंमतीची दिलेली कामे यशस्वीपणे पुर्ण करणे आवश्यक राहील. ज्या नोंदणीकृत सु.बे.अ. यांनी रु ५.०० लक्ष पर्यंतचे पहिले काम यशस्वीरित्या पुर्ण केलेले आहे. अशाच सु.बे.अ. यांना रु १५.०० लक्ष पर्यंतची कामे देण्यासाठी पात्र राहतील आणि हे नियमित कंत्राटदार म्हणून कार्यरत राहतील. अशा कामाची नोंद संबंधित खात्याच्या निविदा शाखेनी विहित पासबुकात नोंद घेणे आवश्यक राहील. आणि संबंधित सु.बे.अ. यांच्या पासबुकातील नोंदी तपासून एक वर्षात रु ६०.०० लक्ष पेक्षा जास्त रकमेची कामे दिली जाणार नाहीत. याची दक्षता संबंधित निविदा शाखेनी कटाक्षाने घ्यावी.

९.जे सु.बे.अ. कामासाठी इच्छापत्र देतील तेव्हा त्या सोबत त्यांना देण्यात आलेले कामाचे पासबुक सादर करणे आवश्यक आहे. जर पासबुक सादर केले नाही तर त्याने एकदा काम नाकारले असे गृहीत धरण्यात येईल व अशा स्थितीत इच्छापत्र असेल तरी सु.बे.अ. यांचे नाव विचारात घेतले जाणार नाही.

१०.ज्या विद्युत बेरोजगार अभियंत्यानी रु २.०० लक्ष एक किंवा तेवढयाच किंमतीची दिलेली कामे यशस्वीपणे पुर्ण केलेली आहेत. अशाच बेरोजगार विद्युत अभियंत्याना रु ५.५० लक्षची कामे देण्यात येतील.

**११. तारण ठेव भरण्यासाठी सु.बे.अ. यांना इतर ठेकेदाराप्रमाणेच मानन्यात येईल.**

**१२. प्रत्येक योग्य प्रकरणात नोंदणीकृत सु.बे.अ. यांना इसारा (बयाणा) रक्कमेच्या अदायी पासून ५० टक्के पर्यत सुट समजली जाईल.**

**१३.** जर काम देणारे संबंधीत खाते व सु.बे.अ. यांचे मध्ये तंटा निर्माण झाला तर त्या विभागातील मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल. हा निर्णय लवादाचा निर्णय म्हणून न राहता प्रशासकीय निर्णय म्हणून मानला जाईल.

१४. मान्यता प्राप्त व नोंदणीकृत सु.बे.अ. यांच्या कामा बाबतचा गोपनिय अहवाल मा. **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी** जिल्हा परिषद ठेवतील त्यांना दिलेल्या कामाची अद्यावत नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ च्या नियम १४७ प्रमाणे नमुना क्रं. ४८ मध्ये ठेवण्यात येईल. अशा सु.बे.अ. यांच्या काम करण्याच्या पात्रतेबाबतचा गोपनिय अहवाल ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे संबंधित मुख्य अभियंता/अधिक्षक अभियंता यांना सादर करुन व त्याची एक प्रत संबंधीत विभागीय आयुक्त यांना पाठविली जाईल. गोपनिय अहवाल व नमुना क्रं. ४८ ठेवण्याची कार्यवाही संबंधीत खात्याच्या निविदा शाखेनी पार पाडावी.

१५. जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर रु ३.०० लक्ष व त्यापेक्षा जास्तीच्या मुल्याची सर्व कामे ई-टेंडरींग माध्यमातुन करण्यात येतील.

१६. जिल्हा परिषद, पंचायत समिती स्तरावरील रु ३.०० लक्ष पेक्षा कमी किंमतीची किंवा रु ३ ते १५ लक्ष किंमती पर्यंतची विकास कामे ग्रामपंचायतीने काम करण्यास नकार दिल्यास मजुर सहकारी संस्था, सु.बे.अ. व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांच्यामध्ये ३३:३३:३४ या प्रमाणात **काम वाटप सनियंत्रण समितीकडून** निश्चित करुन वाटप केली जातील.

१७. विकास कामाचे वाटपा मध्ये पात्र ठरणाऱ्या धारकांना कामे देण्याबद्दल योग्य ते निर्णय घेण्याचे अधिकार काम वाटप सनियंत्रण समितीस राहतील.

१८. जे सुशिक्षित बेरोजगार अभियंता स्वतःच्या नावावर कामे घेऊन इतरांना कामे देतील किंवा सोडून देतील त्यांची नावे नोंदणीकृत यादीतुन रद्य करण्यात येतील.

वरील पैकी कोणत्याही शर्तीचे अनुपालन न केल्यास आपले प्रमाणपत्र रद्य करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता(बांधकाम)
जिल्हा परिषद उस्मानाबाद